रे.दि.मु.क्र.४७/२०१७
(सीएनआर नं.MHST10-000282-2017)

## नि.क्र.२५ खालील आदेश

वाटप व कब्जाच्या दाव्यामध्ये वादी प्रस्तुत अर्जाद्वारे वादपत्रात सुधारणा करुन मागत आहे. वादी क्र.२ हे दिनांक ०४/१०/२०१७ रोजी मयत झालेने त्यांचे वारस पत्नी, दोन मुली व एक मुलगा असे दाव्याकामी सामील करणेबाबतची वादी वादपत्रात सुधारणा करणेची परवानगी मागत आहे. प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल करुन अर्ज उशीरा दाखल केला असल्याचा आक्षेप नोंदविला. युक्तीवाद ऐकले, कागदपत्रे पाहिली.

२) प्रस्तावित दुरुस्तीद्वारे वादी, मयत वादी क्र.२ यांचे वारस वादी म्हणून अभिलेखावर आणणेची सुधारणा करणेची मागणी करीत आहे. या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. मुळ दावा वाटप व कब्जाचा आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्तीमुळे कोणतीही नवीन केस निष्पन्न होत नाही. तथापि विलंबामूळे प्रतिवादीस झालेले कष्ट भरुन काढणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना एकत्रीतरित्या रु.१००/- (रुपये शंभर मात्र) शूल्क देणेच्या अटीवर अर्ज मंजूर.

(२) वादीनी मुदतीत दुरुस्ती करावी.

दिनांक - १७/०४/२०१८
महाबळेश्वर

(प्र.अ.कुंभोजकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महाबळेश्वर